दादासाहेब जोतीराम
गोडसे

आर्टस, कॉमर्स, सायन्स,
कॉलेज वडूज

ता: खटाव.
जि: सातारा.

Seen.

विद्यार्थ्याचे नाव :-
साबळे विजय बबन
रोल नं :- 874
वर्ग :- T.Y.B.COM
विषयाचे नाव : सहकाराचा विकास
शिक्षकाचे नाव :- इंगळे. पी. एस
वर्ष - 2022-23 मॅडम

महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध संस्था

गोकुळ कोल्हापूर जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संघ.

# अनुक्रमणिका


| | घटक | पान नं :- |
|---|---|---|
| 1) | प्रस्तावना | 5 |
| 2) | गोकुळ दूध संस्थेची स्थापना | 6 |
| 3) | गोकुळचा इतिहास | 7 |
| 4) | गोकुळ दूध संघाच महत्त्व | 8 |
| 5) | गोकुळची कार्यप्रणाली | 11 |
| 6) | गोकुळची उलाढाल | 13 |
| 7) | गोकुळ डेअरीचे दरपत्रक | 14 |
| 8) | निष्कर्ष | 15 |
| 9) | संदर्भ सूची | 16 |


FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

आपल्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांसाठी प्रसिद्ध असणारी गोकुळ डेरी भारत देशासह जगभरात ओळखली जाते. कोल्हापूर जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संघ यांच्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या गोकुळ डेअरी ची स्थापना कोल्हापूर मध्ये करण्यात आली. देशभरातील दुग्ध उत्पादक संघामध्ये अमुल नंतरचा गोकुळ दुसरा मोठा दुग्ध उत्पादक संघ आहे. जरी अमुल मोठा दुग्ध संघ असला तरी गुणवत्तेमध्ये गोकुळच अग्रेसर आहे. यात आपण गोकुळ डेरीची स्थापना किती साली झाली ते पाहुन गोकुळची उद्दिष्ट, गोकुळच्या ब्रँड व गोकुळच महत्त्व काय आहे हे अभ्यासणार आहे. गुजराती मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी स्वर्गीय यशवतराव चव्हाण यांनी गोकुळचे दुग्ध मुंबईत येण्यासाठी अतुलनीय सहकार्य केले.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातला सर्वात मोठा दुग्ध संघ म्हणुन गोकुळकडे पाहिले जाते. कोल्हापूर मध्ये प्रसिद्ध असणारी ताकभेव डेअरी म्हणुन कोल्हापूर जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संघाकडे पाहिले जाते.

# स्थापना

प्रकार - सहकारी

स्थापना - 16 मार्च 1963

मुख्यालय - कोल्हापूर

उत्पादने - दुध, श्रीखंड, पनीर, तुप, दही, लस्सी, मसाला दुध, दुध पावडर अनेक पदार्थ.

दुध संस्थेचे अध्यक्ष = विश्वास पाटील

संकेतस्थळ = https:// Gokul .com

# इतिहास

कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ याच्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या गोकुळ डेरीची स्थापणा करण्यात आली. " ऑपरेशन फ्लड योजने अंतर्गत गोकुळची स्थापना 16 मार्च 1963 मध्ये झाली. देशभरात दुधाचा पुरवठा करण्यासाठी या डेअरी ची स्थापणा करण्यात आली होती दुरदर्शी नेते आनंदराव पाटील याच्या संकल्पनेतुन गोकुळ ची स्थापणा करण्यात आली होती. गोकुळच्या स्थापनेनंतर घरोघरी जाऊन दुध संकलन केल जात होते. अधिक दुध वाढवण्यासाठी सुरुवातीला स्वताचे टेकर उपलब्ध करुन दिले.

कोल्हापूरमध्ये आलेल्या पूरपरिस्थीतीमुळे गोकुळ दुधाचे संकलन आणि वितरणावर त्याचा मोठा परीणाम झाला आहे. उपनगरातील दुधाची गरज भागविण्यासाठी गोकुळच्या वतीने सात ते आठ हजार दुधाची गरज लागते. यासाठी तीन दिवस पुरेल इतका आगाऊ दुधसाठा डेरीमध्ये असतो. सुरुवातीला डेअरी स्थापण झाल्यानंतर जास्त दुधपुरवठा नसल्याने तो वाढत वाढत आज इतका वाढला की मागच नाही या डेअरीचा महाराष्ट्रात दुसरा क्रमाक लागतो.




कोल्हापूर =

आमदारकी नको, पण गोकुळचे संचालक द्या अशी एक म्हण कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात प्रचलित आहे. गोकुळची स्थापना झाल्यापासुन कोल्हापूर जिल्ह्यातील एक महत्त्वाची सत्ता आणि आर्थिक केंद्र म्हणजे गोकुळ दुध संघ. याच गोकुळ दुध संघाची निवडनुक सुद्धा होते. द्रष्टे नेते आनंदराव पाटील यांच्या संकल्पनेतुन गोकुळने कोल्हापूर जिल्ह्यात 1963 साली पाया रचला. 16 मार्च 1963 रोजी 1963 रोजी ऑपरेशन फ्लड अंतर्गत कोल्हापूर जिल्हा दुध संघाची स्थापना झाली. आनंदराव पाटील-चुयेकर आणि एन टी सरनाईक यांच्या पुढाकाराने दुध संघाची मुहूर्तमेढ रोवली गेली. गोकुळच्या स्थापनेनंतर घरोघरी जाउन दुध संकलन केले जात होते. आणि आज स्वःताचे दुध टँकर वाहतुकीला लावण्यासाठी राजकीय चढाओढ सुरू असते.

FOR EDUCATIONAL USE

स्थान आणि ऋतु कोणताही असो संपूर्ण भारतभर दुधाला नेहमीच प्रचंड मागणी असते. लोकसंख्येच्या वाढीमुळे भारतात दुधाचा वापर दुप्पट झाला आहे. इथे दररोज जवळपास ५ हजार ८०० च्या आसपास असलेल्या दुध संस्थेच्या माध्यमातुन 13 लाख लीटर दुध संकलित केले जाते. यामधील तब्बल ५ लाख लीटर दुध मुंबईसाठी जाते. आणि हेच सर्वात मोठे राजकीय संघर्षाचे कार्य आहे. कारण हा दुध पुरवठा करण्यासाठी ५० च्या आसपास टँकर आहेत दोन हजारावर कर्मचारी वृंद असलेल्या गोकुळची वार्षिक उलाढाल २१०० कोटीच्या घरात आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातला सर्वात मोठा दुध संघ म्हणुन गोकुळकडे पाहीले जाते. प्रत्येक 10 दिवसाला दुध उत्पादक शेतकऱ्यांना बिले देणे, पशुखाद्य देणे दिवाळीला लाभांश देणे असा परतावा गोकुळकडुन दिला जातो मुंबईत सर्वाधिक पश्चिम महाराष्ट्रातुन गोकुळ दुध संघ दुधाची गरज पूर्ण करतो. या दुध संघावर वर्चस्व ठेवल्यास अनेक निवडणुकात अगदी गावापासुन ते मुंबईपर्यंत राजकीय ताकद वाढते.

शुद्ध प्रतीचे दुध आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन ही कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ म्हणजेच गोकुळच वैशिष्ट्य गोकुळ दुध संघाने या वैशिष्ट्यांच्या बळावर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मानाचं स्थान मिळवलय. यात अजुन भर पडली आहे. म्हणजे गोकुळचे सिलेक्ट टेट्रापॅक यु.एच.टी दुध आता भारतीय नौदल सेनेला पुरवठा

करण्याचा करार झाला आहे. कोल्हापूरसाठी ही अभिमानास्पद बाब आहे. त्यानुसार टेट्रापॅक दुधाच्या पहिल्या २२ हजार लिटरची पहिली बॅच भारतीय नौदल सेनेच्या कारवार कर्नाटक येथे पाठविला आहे.

उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग करून जिलेबट टेट्रापॅक नव्याने उत्पादित केलेले तसेच सामान्य तापमानामध्ये १८० दिवस टिकणारे गोकुळ ब्रॅण्डचे नवीन उत्पादन प्रथमच भारतीय नौदल सेनेच्या कर्नाटक येथील कारवार या सेंटरला 2 लाख 67 हजार लिटर्स दूध पुरवठा आपल्या संघामार्फत होणार आहे.

गोकुळ
डेअरी

## * कार्यप्रणाली. *

आपल्या गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी प्रसिद्ध असणारी गोकुळ डेअरी भारत देशासह जगभरात ओळखली जाते. कोल्हापूरात आज गोकुळ दुध संघाची साठावी वार्षिक सर्वसाधारण सभा होत आहे पूर्वी दुधासाठी महाराष्ट्र गुजरातवर अवलंबुन होता. मुंबईला अमुल दुध संघाकडुन दुध यायचं ही गोष्ट आहे स महाराष्ट्र निर्मिती होण्याआगोदरची मोरारजी देसाईच्या काळात महाराष्ट्रात दुधउद्योग रुजु दिला जात नव्हता. मग जेव्हा यशवतराव चव्हाण मुख्यमंत्री पदी आले. तेव्हा त्यांनी यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांना गरीबीतुन बाहेर काढायचं अस म्हणत त्यांनी मुंबईला राज्याच्या ग्रामीण भागातुन दुध पुरवठा करण्याचा निर्णय केला यशवतराव चव्हाणांच्या पुढाकाराने स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कोल्हापूरात 1963 साली शासकीय दुग्धालयाची उभारणी झाली सहकार क्षेत्रातले

कार्यकर्ते दान टी सरनाईक यांनी या संघाची स्थापना केली. आणि पुढे याच काविर तालुका संघाच जिल्हा मिल्क फेडरेशन झाल इथेच गोकुळचा जन्म झाला. गोकुळचे दुध हे सर्वश्रेष्ठ मानले जाते कोल्हापूरमध्ये आमदारकी नको पण गोकुळच संचालक पद द्या अशी एक म्हण कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात प्रचलित आहे. गोकुळ दुध संघाकडुन जवळजवळ २२ पोडक्त बनवले जातात.

गोकुळची स्थापना झाल्यापासुन या डेअरीत जवळपास 13 लाख लिटर दुध रोज दिवसाला साठा करून ते पुरविले जाते किंवा त्याचे वेगवेगळे उत्पादन करून पाठविली जातात. उदा :- गोकुळ देशी लोणी, गोकुळ लस्सी, गोकुळ पनीर गोकुळ दही, गोकुळ श्रीखंड, गोकुळ तुप गोकुळ कुकींग बटर, गोकुळ मिल्क पावडर, गोकुळ दुध .. इत्यादी उत्पादने तयार करून बाजारात ग्राहकांना वापरण्यासाठी तयार करतात

गोकुळ या डेअरीची वेगळी अशी ओळख कोल्हापूरमध्ये आहे. तसेच दुधाची गुणतत्ता सुधारण्यासाठी पशुना पोष्टीक आहार व नेहमीतपणे पशुवैदयकीय तपासणी केली जाते. तसेच या डेअरीने पशुचे आरोग्य सुधारण्यासाठी मुक्त गोठा संकल्पना राबविण्यात आले. जेणेकरून दुधाची गुणतत्ता वाढेल याकडे पण लक्ष दिले.

# गोकुळची उलाढाल

वार्षिक उलाढाल 2100 कोटी.

दररोज 13 लाख दुध संकलन.

मुंबईला दररोज 8 लाख लिटर दुध पुरवठा

पुरवठा करणारे 90 टँकर, ज्याचे जास्त टँकर त्याला जास्त नफा, जास्त मलई.

दर दहा दिवसाला कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होतात.

आज गोकुळकडे 7 लाख लीटर क्षमतेचा आत्याधुनिक शीत केंद्र.

दुध संघ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारानी सन्मानित.

FOR EDUCATIONAL USE

# दुधाचे दरपत्रक

| दुधाचे प्रकार नवे दर | (प्रति लिटर) | (प्रति युनिट) |
|---|---|---|
| गायीचं दुध [1 लिटर] | 54 रुपये | 54 रुपये |
| गायीचं दुध [500 मिली] | 54 रुपये | 27 रुपये |
| टोन्ड दूध [1 लिटर] | 52 रुपये | 26 रुपये |
| स्टॅण्डर्डाइज दूध [500 मिली] | 54 रुपये | 27 रुपये |

FOR EDUCATIONAL USE

# निष्कर्ष

1) गोकुळ कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाची माहीती मिळवली

2) दुध संस्थेची उत्पादन प्रक्रीया समजुन घेतली

3) संस्थेच्या संचालक मंडळाची माहिती घेतली

4) गोकुळ दुध संघाच महत्त्व काय आहे हे समजुन घेतले.

5) शहरी व ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी मिळतील.

6) दुध सहकारी संस्थेचे कामकाज समजुन घेतले.

7) आमदारकी पेक्षा गोकुळचं संचालक पद द्या कशासाठी हे समजुन घेतल.

# संदर्भ सूची

- गोकूळ दुग्ध डेअरी चा अहवाल
- सहकाराचा विकास पाठ्यपुस्तक
- Google . Gokul . com. dairy
- chrome - w.w.w . Gokul .com .